भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CK 054876

उप कोषागार कार्यालय वाडा
16 APR 2026
उप कोषागार अधिकारी
वाडा ता. जि. पालघर

Devsey Arts College & Commerce & Sc... Wada ... Palghar

## सामंजस्य करार

**करियर कट्टा व शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे**

**डॉ. शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय व वाणिज्य व विज्ञान महविद्यालय वाडा ता. वाडा जि.पालघर**

**"College of Excellence with Potential (CoE-P)"**

1. पार्श्वभूमी

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा "करिअर कट्टा" हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन, उद्योजकता विकास, कौशल्य प्रशिक्षण, भावनिक बुद्धिमत्ता व आर्थिक साक्षरता या क्षेत्रांमध्ये सक्षम करण्याचे कार्यकेले जाते.

तथापि, राज्यातील सर्वमहाविद्यालयांमध्ये "Center of Excellence" उभारणीसाठी आवश्यक असणारी भौतिक सुविधा, आर्थिक क्षमता व आवश्यक पायाभूत रचना उपलब्ध नसल्यामुळे अपेक्षित प्रमाणात COE स्थापन करणे शक्य झालेले नाही. विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील लहान महाविद्यालयांमध्ये जागेचा अभाव, संसाधनांची मर्यादा व विद्यार्थीसंख्येची मर्यादा यामुळे या महाविद्यालयांना या उपक्रमाचा पूर्णलाभ मिळू शकत नाही.

जोडपत्र - १

MOU

या पार्श्वभूमीवर, COE साठी पात्र नसलेल्या परंतु कार्यक्षम व इच्छुक महाविद्यालयांसाठी "College of Excellence with Potential (CoE-P)" ही योजना राबविण्यात येत असून याबाबत करिअर कट्ट्या अंतर्गत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व महाविद्यालय यांच्यामध्ये असणारा सामंजस्य करार पुढील प्रमाणे:

**पार्टी नंबर १**
**यशवंत शितोळे, अध्यक्ष**
**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र**
**पत्ता: करिअर कट्टा, महिला बँक तळमजला, खासबाग मैदानाजवळ,**
**मंगळवार पेठ, कोल्हापूर-१२**

**पार्टी नंबर २**
**प्राचार्य नाव: डॉ. सुरेन्द्र सखाराम खांडेकर**
**महाविद्यालयाचे नाव: शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे**
**डॉ. शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय व वाणिज्य व विज्ञान महविद्यालय वाडा ता. वाडा जि.पालघर**
**पत्ता: कोलेकर पाडा, ता.वाडा, जि.पालघर ४२१३०३**

**2. संकल्पना**

राज्यात सध्या मर्यादित ठिकाणी Center of Excellence द्वारे विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध आहेत. त्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना या सुविधांचा लाभ मिळत नाही.

**"College of Excellence with Potential (CoE-P)"** ही संकल्पना अशा महाविद्यालयांसाठी आहे जिथे पूर्ण स्वरूपातील Center of Excellence उभारणे शक्य नाही, परंतु टप्प्याटप्प्याने करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास व उद्योजकता प्रोत्साहन यासाठी आवश्यक प्रणाली उभी करता येऊ शकते. या योजनेच्या माध्यमातून कमी खर्चात स्थानिक पातळीवर कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षणाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाईल.

---

**3) उद्दिष्टे**

1. लहान व मध्यम महाविद्यालयांमध्ये करिअर मार्गदर्शनाची प्रभावी यंत्रणा निर्माण करणे.
2. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता व स्टार्टअप संस्कृती विकसित करणे.
3. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शहराकडे होणारे स्थलांतर कमी करणे.
4. विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास व रोजगारक्षमतेत वाढ करणे.
5. भविष्यात Center of Excellence स्थापनेसाठी आवश्यक पाया तयार करणे.

---

**4) पात्रता व सहभाग**

1. 1000 पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेली महाविद्यालये या योजनेसाठी पात्र राहतील.
2. महाविद्यालये वैयक्तिक किंवा क्लस्टर पद्धतीने सहभागी होऊ शकतात.
3. क्लस्टरमध्ये जास्तीत जास्त 5 महाविद्यालयांचा समावेश करता येईल.
4. क्लस्टरमधील महाविद्यालये 20 किमी परिसरात असणे आवश्यक आहे.
5. क्लस्टरमधील सर्व महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार करणे बंधनकारक राहील.
6. सामंजस्य करारानंतर संबंधित महाविद्यालयांना 5 वर्षांपर्यंत क्लस्टरमधून बाहेर पडता येणार नाही.

---

**5) आर्थिक तरतूद व अंमलबजावणी**

1. विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार प्रोत्साहनपर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.
2. संबंधित महाविद्यालयांना वस्तू स्वरूपातील सुविधा किंवा कार्यशाळा यांपैकी पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य राहील.
3. महाविद्यालयाने आवश्यकतेनुसार मागणीपत्र (Demand Letter) सादर करणे बंधनकारक राहील.

**2. संकल्पना**

राज्यात सध्या मर्यादित ठिकाणी Center of Excellence द्वारे विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध आहेत. त्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना या सुविधांचा लाभ मिळत नाही.

**"College of Excellence with Potential (CoE-P)"** ही संकल्पना अशा महाविद्यालयांसाठी आहे जिथे पूर्ण स्वरूपातील Center of Excellence उभारणे शक्य नाही, परंतु टप्प्याटप्प्याने करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास व उद्योजकता प्रोत्साहन यासाठी आवश्यक प्रणाली उभी करता येऊ शकते. या योजनेच्या माध्यमातून कमी खर्चात स्थानिक पातळीवर कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षणाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाईल.

---

**3) उद्दिष्टे**

1. लहान व मध्यम महाविद्यालयांमध्ये करिअर मार्गदर्शनाची प्रभावी यंत्रणा निर्माण करणे.
2. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता व स्टार्टअप संस्कृती विकसित करणे.
3. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शहराकडे होणारे स्थलांतर कमी करणे.
4. विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास व रोजगारक्षमतेत वाढ करणे.
5. भविष्यात Center of Excellence स्थापनेसाठी आवश्यक पाया तयार करणे.

---

**4) पात्रता व सहभाग**

1. 1000 पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेली महाविद्यालये या योजनेसाठी पात्र राहतील.
2. महाविद्यालये वैयक्तिक किंवा क्लस्टर पद्धतीने सहभागी होऊ शकतात.
3. क्लस्टरमध्ये जास्तीत जास्त 5 महाविद्यालयांचा समावेश करता येईल.
4. क्लस्टरमधील महाविद्यालये 20 किमी परिसरात असणे आवश्यक आहे.
5. क्लस्टरमधील सर्व महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार करणे बंधनकारक राहील.
6. सामंजस्य करारानंतर संबंधित महाविद्यालयांना 5 वर्षांपर्यंत क्लस्टरमधून बाहेर पडता येणार नाही.

---

**5) आर्थिक तरतूद व अंमलबजावणी**

1. विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार प्रोत्साहनपर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.
2. संबंधित महाविद्यालयांना वस्तू स्वरूपातील सुविधा किंवा कार्यशाळा यांपैकी पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य राहील.
3. महाविद्यालयाने आवश्यकतेनुसार मागणीपत्र (Demand Letter) सादर करणे बंधनकारक राहील.

**प्रोत्साहन रचना:**

| अ.क्र. | विद्यार्थी संख्या | प्रोत्साहन रक्कम (वस्तू / कार्यशाळा) |
|---|---|---|
| 1 | 150 किंवा त्याहून अधिक | ₹9,000/- |
| 2 | 300 किंवा त्याहून अधिक | ₹18,000/- |
| 3 | 500 किंवा त्याहून अधिक | ₹30,000/- |
| 4 | 750 किंवा त्याहून अधिक | ₹50,000/- |
| 5 | 1000 किंवा त्याहून अधिक | ₹60,000/- |

---

**6) योजनेचे प्रमुख घटक**

**(अ) उद्योजकता विकास व स्टार्टअप प्रोत्साहन**

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची मानसिकता विकसित करणे व स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्यासाठी खालील उपक्रम राबविण्यात येतील :

- **अविष्कार स्पर्धा पूर्वतयारी कार्यशाळा**
  - प्रति महाविद्यालय / क्लस्टर : ₹15,000/- पर्यंत
  - संकल्पना विकास, प्रोजेक्ट मार्गदर्शन व प्रेझेंटेशन कौशल्य प्रशिक्षण
- **Startup Summit आयोजन**
  - जिल्हास्तरीय : ₹30,000/-
  - विभागीय : ₹50,000/-
- **स्टार्टअप मेंटॉरशिप**
  - ऑनलाइन / ऑफलाइन मार्गदर्शन
  - आयडिया व्हॅलिडेशन
  - बिझनेस मॉडेल विकसित करण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शन

**(ब) सुविधा व वस्तू आधारित प्रोत्साहन**

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी उपक्रमांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खालील वस्तू / सेटअप उपलब्ध करण्यात येतील :

- Skill Training Modules
- Kick Start Setup
- एक दिवसीय कार्यशाळा आयोजन
- Book Storage for Library
- Welcome Board

Devsey Arts College & Commerce
da
alghar

- Printer
- Karaoke System
- Round Table & Chairs
- Recording Corner
- Sanitary Pad Vending Machine

---

**6. गुणवत्ता व नियंत्रण**

1. प्रत्येक महाविद्यालयामध्ये करिअर संसदेची स्थापना करणे आवश्यक राहील.
2. किमान दोन समन्वयक नियुक्त करणे बंधनकारक राहील.
3. सर्व उपक्रमांचे नियमित अहवाल सादर करणे आवश्यक राहील.
4. करिअर कट्टाद्वारे उपक्रमांचे निरीक्षण व मूल्यांकन केले जाईल.

---

**7. नियम व अटी**

1. संबंधित महाविद्यालयाचा करिअर कट्टा सोबत सामंजस्य करार (MoU) असणे आवश्यक आहे.
2. सामंजस्य करारामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी कार्यरत (Active) असणे आवश्यक आहे.
3. करिअर कट्टा मासिकाचे सभासदत्व असणे आवश्यक आहे.
4. शासन निर्देशानुसार प्रवेश शुल्कामध्ये करिअर कट्टा शुल्काचा समावेश करण्यात आलेला असणे आवश्यक आहे.
5. दिनांक 14 जून ते 30 नोव्हेंबर या कालावधीत नोंदणीकृत विद्यार्थ्यांच्या संख्येच्या आधारे महाविद्यालयांची निवड करण्यात येईल.
6. एका क्लस्टरमध्ये कमाल 5 महाविद्यालयांचा सहभाग करता येईल.
7. क्लस्टरमधील महाविद्यालयांना क्लस्टरमधून 5 वर्षांपूर्वी बाहेर पडता येणार नाही.
8. निवड झालेल्या महाविद्यालयांसाठी निवड कालावधी एक वर्षाचा राहील. प्रतिवर्षी यादी नव्याने घोषित करण्यात येईल व त्या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयातील नोंदणीकृत विद्यार्थी संख्येनुसार योजनेचा लाभ उपलब्ध होईल.
9. या योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचे तसेच Add-on Courses चे अहवाल नियमित व वेळेत सादर करणे महाविद्यालयांना बंधनकारक राहील.
10. महाविद्यालयला एकाच वेळी Center of Excellence व College of Excellence with Potential (CoE-P) या दोन्ही योजनांमध्ये सहभागी होता येणार नाही.

---

**8. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) यांची जबाबदारी:**

1. CoE-P मध्ये सहभागी महाविद्यालयांना प्रशिक्षण, कार्यशाळा किंवा वस्तू स्वरूपातील सुविधा उपलब्ध करून देणे.

...vsey Arts College & Comme... a ...ghar

2. CoE-P योजनेअंतर्गत कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यकतेनुसार वेळोवेळी भेटी देणे व मार्गदर्शन करणे.
3. CoE-P अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांवर नियमन व नियंत्रण ठेवणे.
4. सहभागी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पद्धतीने तज्ञ मार्गदर्शक, प्रशिक्षक व उद्योग क्षेत्रातील व्यक्ती उपलब्ध करून देणे.
5. CoE-P योजना आणि शासन/संबंधित विभाग यांच्यामध्ये समन्वयक म्हणून कार्य करणे.
6. सहभागी महाविद्यालयांनी स्थापन केलेल्या समितीच्या सभा घेण्यासाठी मार्गदर्शन करणे व आवश्यक त्या निर्णय प्रक्रियेस सहाय्य करणे.
7. CoE-P अंतर्गत मंजूर प्रोत्साहन (सुविधा/कार्यशाळा) यांचा वापर योग्य उद्देशासाठी होतो आहे यावर नियंत्रण ठेवणे.
8. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असे धोरणात्मक व विद्यार्थी हिताचे निर्णय घेणे.
9. महाविद्यालयांकडून सादर केलेल्या मागणीपत्र व विद्यार्थ्यांच्या नोंदणीच्या आधारे सुविधा/उपक्रमांचे नियोजन व वितरण करणे.
10. CoE-P अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे मॉनिटरिंग, मूल्यांकन व गुणवत्ता नियंत्रण करणे.

---

**9. महाविद्यालयाची जबाबदारीः**

1. CoE-P मध्ये सहभागी असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची करिअर कट्टा अंतर्गत नोंदणी करून त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे.
2. महाविद्यालयामध्ये CoE-P अंतर्गत उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक जागा, मूलभूत सुविधा व शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे.
3. CoE-P अंतर्गत प्राप्त झालेल्या साहित्याची/सुविधांची देखभाल व आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे.
4. करिअर कट्ट्याकडून वेळोवेळी मागवले जाणारे अहवाल, माहिती व उपक्रमांचे दस्तऐवजीकरण वेळेत सादर करणे.
5. क्लस्टर पद्धतीने सहभाग असल्यास इतर सहभागी महाविद्यालयांशी समन्वय साधून उपक्रमांची अंमलबजावणी करणे.
6. CoE-P योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी महाविद्यालयाच्या संस्थेची आवश्यक परवानगी व प्रशासकीय पूर्तता करून घेणे.
7. विद्यार्थ्यांना आयोजित कार्यशाळा, प्रशिक्षण, Startup उपक्रम व मार्गदर्शन सत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे.

8. CoE-P अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या सुविधा व संसाधनांचा उद्देशपूर्णव कार्यक्षम वापर करणे.

9. विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास, उद्योजकता व करिअर प्रगतीस पूरक असे वातावरण महाविद्यालयामध्ये निर्माण करणे.

**कालावधी:**

सदर सामंजस्य करार नोंदणी तारखेपासून ६० महिन्याच्या कालावधीसाठी आहे.

**न्यायालयीन कार्यक्षेत्र :**

सदर सामंजस्य करारांतर्गत उद्भवलेल्या कोणत्याही कायदेशीर समस्येसाठी न्यायालयीन प्रक्रियेसाठी कोल्हापूर जिल्हा न्यायालय हे कार्यक्षेत्र असेल.

**दुरुस्ती व बदल :**

सदर सामंजस्य करारांतर्गत नियम अटी व कार्यपद्धतीमध्ये काळानुरूप विद्यार्थीहितासाठी काही बदल करावयाचे झाल्यास दोघांच्या संमतीने स्वतंत्र परिशिष्टाचा समावेश करून बदल करता येतील.

**पार्टी नंबर १**
**यशवंत शितोळे**
**अध्यक्ष**
**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र**

**पार्टी नंबर २**
**प्राचार्य नाव: डॉ. सुरेन्द्र सखाराम खांडेकर**
**महाविद्यालयाचे नाव: शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे**
**डॉ. शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय व वाणिज्य व विज्ञान महविद्यालय वाडा ता. वाडा जि.पालघर**
**पत्ता: कोलेकर पाडा, ता.वाडा, जि.पालघर ४२१३०३**

साक्षीदार

1) नाव :

साक्षीदार

1) नाव :